2 1 OCT 2025
पुढारी

# अन्नविज्ञानाच्या विद्यार्थ्यांची शाश्वत अन्नप्रणालीत भविष्यात मोठी भूमिका

- कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे; विद्यापीठात फूड बिझनेस जागृती कार्यशाळा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

अन्नविज्ञानाच्या विद्यार्थ्यांची शाश्वत अन्नप्रणालीमध्ये भविष्यात मोठी भूमिका असणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

जागतिक अन्न दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या अन्न विज्ञान व तंत्रज्ञान अधिविभागातर्फे विद्यापीठातील विद्यार्थी, परिसरातील फूड बिजनेस ऑपरेटर यांच्यासाठी मार्गदर्शन तथा जागृतीपर कार्यशाळा झाली. यावेळी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी अन्न पदार्थांची नैसर्गिकता व लुप्त होत असलेली नैसर्गिक चव तसेच लोकांची अन्नपदार्थाविषयी बदलती संकल्पना याविषयी खंत व्यक्त केली. सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. के. पवार यांनी कार्यशाळा आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त यू. एस. लोहकरे यांनी नफेखोरीसाठी केली जाणारी भेसळ व




ती भेसळ सहजरीत्या कशी ओळखावी हे सांगितले. अन्न व औषध प्रशासनाच्या कोल्हापूर विभागाचे अन्नसुरक्षा अधिकारी विजय पाचपुते यांनी एफएसआय परवाना, एफडीएच्या कामकाजाची माहिती दिली.

विभागप्रमुख डॉ. प्रवीणकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अभिजित गाताडे, डॉ. हर्षवर्धन कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अश्विनी देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी हर्षद कांबळे, वैभव बागे यांचे सहकार्य लाभले.

2 1 OCT 2025

पुण्यनगरी

# In Short



कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

## न्यू कॉलेजमध्ये ग्रंथालय संशोधन कार्यशाळा

**कोल्हापूर :** श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचालित न्यू कॉलेजच्या ग्रंथालय विभागातर्फे शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत 'ग्रंथालयांची संशोधनात भूमिका' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यशाळेचे उद्घाटन व अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी भूषविले. संशोधनाची नवी दिशा आणि ज्ञानप्रसारात ग्रंथालयांची मध्यवर्ती भूमिका अधोरेखित करण्याच्या उद्देशाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे बीजभाषण शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. बी. पाटील यांनी, तर दुसऱ्या सत्रात प्रा. टी. एल. कांबळे यांनी 'संशोधनात ग्रंथपालांची भूमिका' या विषयावर तसेच तृतीय सत्रात प्रा. डॉ. युवराज जाधव यांनी 'बेसिक कन्सेप्ट ऑफ रिसर्च' या विषयांवर मार्गदर्शन केले. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. आर. पी. आडाव यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. अरविंद घोडके यांनी केले.